आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

१६ नोव्हेंबर २०२४ - शनिवार

**ठळक बातम्या**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आजपासून नायजेरिया, ब्राझील आणि गयाना या तीन देशांच्या दौऱ्यावर
- प्रधानमंत्र्यांचा नमो ॲपच्या माध्यमातून महाराष्ट्र भाजपाच्या बूथ कार्यकर्त्यांशी संवाद
- महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेची सद्यस्थिती चिंताजनक असल्याची काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पी. चिदंबरम यांची मुंबईत टीका
- उत्तर प्रदेशातल्या झाशी इथं वैद्यकीय रुग्णालयात लागलेल्या आगीत १० बालकांचा मृत्यू, तर बिजनौर इथं रस्ते अपघातात ७ जण मृत्युमुखी

**आणि**

- स्क्वॅशच्या मलेशिया चषक स्पर्धेत भारताच्या अभय सिंगची उपांत्य फेरीत धडक

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आजपासून नायजेरिया, ब्राझील आणि गयाना या तीन देशांच्या दौऱ्यावर जाणार आहेत. सहा दिवसांच्या या दौऱ्याच्या पहिल्या टप्प्यात प्रधानमंत्री नायजेरियाचे राष्ट्राध्यक्ष बोला अहमद टिनुबू यांच्या निमंत्रणावरून नायजेरियाला जाणार आहेत. गेल्या १७ वर्षांत भारताच्या प्रधानमंत्र्यांची ही पहिलीच नायजेरिया भेट असेल. त्यानंतर G20 शिखर परिषदेला उपस्थित राहण्यासाठी मोदी १८ तारखेला ब्राझीलच्या दोन दिवसांच्या दौऱ्यावर जाणार

आहेत. जी 20 शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर मोदी अनेक नेत्यांना भेटणार आहेत. तिसऱ्या आणि शेवटच्या टप्प्यात मोदी १९ ते २१ नोव्हेंबर या कालावधीत गयानाचा दौरा करणार आहेत. १९६८ नंतर एखाद्या भारतीय प्रधानमंत्र्यांची ही गयानाची पहिली भेट असेल.  मोदी गयानाचे अध्यक्ष अली यांच्याशी चर्चा करतील. गयानात जॉर्जटाउनमध्ये मोदी दुसऱ्या कॅरिकॉम -इंडिया शिखरपरिषदेत सहभागी होतील.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज नमो ॲपच्या माध्यमातून महाराष्ट्रातल्या भाजपाच्या बूथ कार्यकर्त्यांशी संवाद साधला. 'मेरा बूथ सबसे मजबूत' ही या संवादामागची संकल्पना होती. मतदारांना भाजपाच्या संकल्पांची माहिती समजावून सांगून भाजपाला मतदान करण्याचं आवाहन प्रेमानं करावं, असं मोदी यांनी मार्गदर्शन करताना सांगितलं. महाराष्ट्रातल्या जनतेचं प्रेम आपण अनुभवलं असून महायुतीचं सरकार पुन्हा एकदा सत्तेत येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा दिल्यामुळे भाजपासाठी अनुकूल वातावरण असल्याचं ते म्हणाले.

**<><><><><>**

चुकीची माहिती देऊन ती पसरवणाऱ्या समाज माध्यमांच्या आजच्या युगात सरकार खंबीर आणि दृढनिश्चयी आहे, असं मत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी खाजगी माध्यम संस्थेनं आयोजित केलेल्या लीडरशिप समिटमधे व्यक्त केलं. सरकार मतपेढीच्या राजकारणापासून दूर असून लोकांच्या प्रगतीचा मंत्र घेऊन काम करत आहे, देशाला विकसित राष्ट्र बनवण्याचं सरकारचं उद्दिष्ट आहे असं ते म्हणाले.

भारत लवकरच जगातली तिसरी मोठी अर्थव्यवस्था बनेल, असा विश्वास मोदी यांनी व्यक्त केला. भारताला विकसित अर्थव्यवस्था बनवणं हे आपलं लक्ष्य असल्याचं ते म्हणाले.

**<><><><><>**

राहुल गांधी विरोधी पक्ष नेता झाल्यानंतर संसदेत चर्चेचा आणि संवादाचा स्तर खाली गेल्याचा आरोप केंद्रीय अल्पसंख्याक मंत्री आणि भाजपाचे नेते किरण रिजिजू यांनी केला. ते आज नागपूरात भाजपा कार्यालयात वार्ताहर परिषदेत बोलत होते. ज्या काँग्रेसनं डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना भारतरत्न पुरस्कार द्यायला इतका विलंब केला आणि आणीबाणीच्या माध्यमातून संविधानाचा अपमान केला अशा काँग्रेसला संविधान, दलित, आदिवासी उच्चारण्याचा अधिकार नाही, असंही ते म्हणाले. या हिवाळी अधिवेशनात वक्फ सुधारणा विधेयक पारित करून गरीब मुस्लमानांना त्यांचे न्याय्य हक्क मिळवून देऊ, असं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

उद्योग, सेवा, कृषी क्षेत्रात पूर्वी आघाडीवर असलेल्या महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेची सद्यस्थिती चिंताजनक असल्याचं काँग्रेस नेते आणि माजी अर्थमंत्री पी. चिदंबरम यांनी म्हटलं आहे. ते आज मुंबई प्रदेश काँग्रेसच्या वार्ताहर परिषदेत बोलत होते. बेरोजगारी हा राज्यासमोरचा सर्वांत गंभीर प्रश्न असल्यानं तरुण बेरोजगारांची व्यथा डोळ्यांसमोर ठेवून मतदारांनी येत्या विधानसभा निवडणुकीत मतदान करावं, असं आवाहन त्यांनी केलं. राज्यातले उद्योग गुजरातला जाण्यावरूनही त्यांनी सरकारवर टीका केली. सरकारनं उद्योगपतींचं १५ लाख कोटी रुपयांचं कर्ज माफ केलं, पण शेतकऱ्यांचं कर्ज मात्र त्यांना माफ करता आलं

नाही, असं ते म्हणाले. राज्याची अर्थव्यवस्था घसरण्याला भाजपाच्या नेतृत्वातलं सरकार जबाबदार आहे, असा आरोप त्यांनी केला. इंडिया आघाडीनं तेलंगण, कर्नाटकात दिलेली आश्वासनं पूर्ण केल्याचं त्यांनी सांगितलं. लोकसभा निवडणुकीच्या वेळी काँग्रेसच्या राष्ट्रीय जाहीरनाम्यात दिलेलं आश्वासन महाराष्ट्रात सत्ता आल्यावर पूर्ण करू, अशी हमी त्यांनी दिली. मुंबई शहरासाठी महाविकास आघाडीने तयार केलेल्या 'मुंबईनामा' या जाहीरनाम्याचं प्रकाशन यावेळी करण्यात आलं.

**<><><><><>**

शेतकऱ्यांचं ७० हजार कोटी रुपयांचं कर्ज आम्ही माफ केलं होतं परंतु आता देशातल्या २५ अब्जाधीशांचं १६ लाख कोटींचं कर्ज नरेंद्र मोदी सरकारनं माफ केल्याचा आरोप  लोकसभेतील विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांनी केला आहे. ते आज अमरावतीच्या धामणगाव रेल्वे इथं आयोजित प्रचार सभेत बोलत होते. शेतकरी, मजूर, महिला यांना हे पैसे मिळतील असे प्रयत्न आम्ही करणार असून ते कधीही अब्जाधीशांच्या घशात जाऊ देणार नाही, असं त्यांनी सांगितलं. प्रधानमंत्र्यांनी अब्जाधीशांसाठी नव्हे, तर देशातील गरिबांसाठी काम करायला हवं, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

महाराष्ट्रात महाविकास आघाडीचं राज्य आल्यास महिलांना संरक्षण दिलं जाईल, असं आश्वासन उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते उध्दव ठाकरे यांनी काल नाशिक इथं प्रचार सभेत दिलं. राज्यात महाविकास आघाडी सरकारनं चांगलं काम केलं असताना केवळ महाराष्ट्राची लूट करून गुजरातला टाटा स्कायबस

सारखे प्रकल्प देण्यासाठी आपलं सरकार पाडण्यात आलं, असा आरोप ठाकरे यांनी केला.

**<><><><><>**

वंचित बहुजन आघाडी सत्तेत जायचा प्रयत्न करेल, असं विधान पक्षाचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी आज वार्ताहरांशी बोलताना केलं. आता तत्वांचं राजकारण संपलं असून संधीसाधू राजकारण सुरू झालं आहे, असं आंबेडकर म्हणाले. महाराष्ट्रात शेतमालाचे भाव पडले आहेत त्यावर आज कुणीही बोलत नाही, तर धर्माच्या नावाने मतं मागितली जात आहेत. जातीजातीत फूट पाडली जात आहे, असंही आंबेडकर म्हणाले.

**<><><><><>**

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं 'आढावा विधानसभा मतदारसंघांचा' हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात आज कोल्हापूर जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

**<><><><><>**

उत्तर प्रदेशातल्या झाशी शहरातल्या महाराणी लक्ष्मीबाई वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयात, काल रात्री लागलेल्या आगीत, अतिदक्षता विभागातल्या १० बालकांचा जळून मृत्यू झाला तर १६ बालकं जखमी झाली आहेत. ही दुर्घटना घडली तेव्हा या अति दक्षता विभागात ४७ बालकं होती. उत्तर प्रदेशचे उपमुख्यमंत्री बृजेश पाठक यांनी घटनास्थळी भेट देऊन या घटनेची त्रिस्तरीय चौकशी करण्याच्या सूचना दिल्या.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी नवजात बालकांच्या मृत्यूबाबत शोक व्यक्त केला आहे. तसंच, या दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्या प्रत्येक बालकाच्या कुटुंबियांना प्रधानमंत्री राष्ट्रीय मदत निधीतून २ लाख रुपये, तर जखमींना प्रत्येकी ५० हजार रुपयांची मदत जाहीर केली आहे.

**<><><><><>**

उत्तर प्रदेशातल्या बिजनौर इथं आज सकाळी झालेल्या एका रस्ते अपघातात ७ जणांचा मृत्यू तर २ जण जखमी झाले. मृतांमध्ये एकाच कुटुंबातल्या ६ जणांचा समावेश आहे. डेहराडून नैनिताल राष्ट्रीय महामार्गावर भरधाव वेगानं जाणारी कार एका तिचाकी वाहनाला धडकल्यानं हा अपघात घडला. जखमींवर रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

**<><><><><>**

महाराष्ट्रात रेल्वेच्या माध्यमातून एक लाख ६४ हजार ६०५ कोटी रुपयांची गुंतवणूक होत आहे, असं रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितलं. ते आज मुंबईत वार्ताहर परिषदेत बोलत होते. राज्यात ६ हजार किलोमीटर रेल्वे मार्गाचं काम सुरू आहे, असंही त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

विविध क्षेत्रांमध्ये नाविन्यपूर्ण उपक्रम सुरू करण्यासाठी आंध्र प्रदेश सरकारने IIT मद्राससोबत आठ सामंजस्य करार केले आहेत. अमरावती इथं डीप टेक इनोव्हेशन हबची स्थापना करणं, स्वयमसारख्या डिजिटल कौशल्य व्यासपीठांमध्ये वाढ करणं, विद्यार्थी आणि शिक्षकांसाठी मार्गदर्शन उपक्रम सुरू करणं याचा या करारांमध्ये समावेश आहे.

**<><><><><>**

समाजात स्वतंत्र आणि जबाबदार पत्रकारितेची आवश्यकता अधोरेखित करण्यासाठी आज देशभरात राष्ट्रीय पत्रकारिता दिवस साजरा होत आहे. माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी नवी दिल्ली इथं होणाऱ्या कार्यक्रमात ‘पत्रकारितेचं बदलतं स्वरुप’ या विषयावर उपस्थितांशी संवाद साधतील. माध्यमांनी कुणाच्याही दबावाखाली न येता आपली उच्च मूल्यं जपावीत हे सुनिश्चित करण्यासाठी, प्रेस कौन्सिल ऑफ इंडियानं १९६६ मधे आजच्या दिवशी जागल्याच्या भूमिकेत आपलं कार्य सुरू केलं होतं, त्यामुळे आजचा दिवस राष्ट्रीय पत्रकारिता दिवस म्हणून साजरा केला जातो.

**<><><><><>**

क्वालालंपूर इथं स्क्वॅशच्या मलेशिया चषक स्पर्धेत भारताच्या अभय सिंगनं उपांत्य फेरीत धडक मारली आहे. काल झालेल्या उपांत्यपूर्व सामन्यात त्यानं वेलावन सेंथिलकुमारचा ३-१ असा पराभव केला. आज अभयची उपांत्य फेरीतली लढत मलेशियाच्या एईन यॉव शी होईल.

**//<><><><><>//**